# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ०३/०१/२०२५ अनु.क्र. ०३

**(अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)**

- **नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.**
- **उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.**
- **महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.**
- **जातीयसलोखा वाढविणे.**
- **संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.**
- **रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.**
- **पोलीसकोठडीतगुन्हे घडु न देणे.**
- **आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.**
- **" सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.**

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### रजा

**१.पोआअ/आस्था-५/से.नि.पु.रजा/१११५०/२०२४ अमरावती शहर दिनांक २४/१२/२०२४**

### आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार हे त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या दिनांकास नियत वयोमानाने सेवानिवृत्त होणार असल्याने त्यांनी सेवानिवृतिपुर्व रजा मंजुरी बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

| अ.क्र. | अंमलदारांचे नाव,पदनाम,ब.न | नेमणुक | नियतवयोमानाने सेवानिवृत्त दिनांक | मंजुर केलेली रजा |
|---|---|---|---|---|
| १ | सपोउपनि/४६४, शेख सलीम शेख | पो.स्टे.नागपुरी गेट | दि.३१/०५/२०२५ | ३० दिवस |
| २ | सपोउपनि/७११, राजु पाचंगे | नियंत्रण कक्ष | दि.३१/०३/२०२५ | ३० दिवस |

उपरोक्त पोलीस अंमलदार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६६(१) तरतुदीनुसार आणि प्रशासकीय कामाची निकड व त्यांचे सेवेची आवश्यकता विचारात घेवुन वरील प्रमाणे सेवानिवृत्तीपुर्व रजा मंजुर करण्यात येत आहे.तरी त्यांना यापुढे रजा वाढवुन देण्यात येणार नाही हयाची नोंद घ्यावी.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

### शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/लोक.निवड-२०२४/क.अह./अंतिम आदेश/पोना-१४४३ महींगे + २/१०२९६/२०२४ अमरावती शहर दिनांक ०२/१२/२०२४**

### आदेश

**संदर्भ क्रमांक:-** १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीसस्टेशन नागपुरीगेट, अमरावती शहर यांचेकडील जावक क्रमांक ९६५/२०२४, दिनांक ०८/०७/२०२४

२) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचेकडील जावक क्रमांक १२२९/१२१२/१२३०/२०२४ गैरहजरकसुरी अहवाल.

३) या कार्यालयाचीकारणे दाखवा नोटीसक्रमांक पोआअश/विचौ-२/गैरहजर/कसुरी अहवाल/ /का.दा.नो./पोना-१४४३ + ३/६८३१/२०२४, दिनांक २९/०७/२०२४

**कसुरदारचे नाव :-** १) पोना/१४४३ निलेश महिंगे, नेम.पो.स्टे.फ्रेजरापुरा, २) पोशि/५७९ अभिषेक दिक्षीत, ३) पोहवा/१२८७ संजय बेलसरे, सर्व नेम.पोलीस मुख्यालय, ४) मपोशि/१२६९ सुजाता वानखडे, नेम.पो.स्टे. नागपुरीगेट, अम. शहर.

**थोडक्यातकसुरी :-**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे कर्तव्य नेमण्यात आलेले होते. तरी तुम्ही वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय पोलीस खात्यात लोकसेवक असल्याचेकोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर गैरहजर राहता. तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे. तुम्ही पोलीस खात्या सारख्या शिस्तीच्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे.

| अ क्र | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यातकसुरी | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | पोना/१४४३ निलेश महिंगे | पो.स्टे. फ्रेजरपुरा (उज.कोर्स पो.मुख्या., अम.शहर) | दि.०६/०६/२०२४ रोजी चेसकाळी १०.०० वा. गणनेवर हजर राहणे अपेक्षित असतांना गणनेवर हजर न राहताकोणतीही पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे दि.०६/०६/२०२४ ते दि.२५/०६/२०२४ पर्यत गैरहजर राहिले. | दि. ०६/०६/२०२४ ते दि. २५/०६/२०२४ पर्यत एकुण २० दिवस गैरहजर राहिले. |
| २ | पोहवा/१२८७ संजय बेलसरे | पो.मुख्या., अम.शहर | दि.०१/०६/२०२४ रोजी गणनेवरुन कोणतीही पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणेगैरहजर राहिले. हजर राहणे अपेक्षित असतांना गणनेवर हजर न राहता दि.०१/०६/२०२४ ते दि.२८/०६/२०२४ पर्यत गैरहजर राहिले. | दि. ०१/०६/२०२४ ते दि. २८/०६/२०२४ पर्यत एकुण २८ दिवस गैरहजर राहिले. |
| ३ | मपोशि/१२६९ सुजाता वानखडे | पो.स्टे. नागपुरीगेट | चार दिवस किरकोळ रजा मागीतली असता पो.स्टे.ला महिला कमी असल्याने नंतर देतो असे वरिष्ठांनी सांगीतले होते. दि.२८/०५/२०२४ रोजी नविन सुधारणा कायदाचे प्रशिक्षण पो.आयु.कार्या. अम.शहर मिटींगहॉल येथे लावले असता नमुद मपोअंमहया प्रशिक्षणा लागेल्या नसुन दि.२८/०५/ २०२४ ते दि.२६/०६/२०२४ पर्यत वरिष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे गैरहजर राहिल्या. | दि. २८/०५/२०२४ ते दि. २६/०६/२०२४ पर्यत एकुण ३० दिवस गैरहजर राहिले. |

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. १०००/- (अक्षरी - एकहजार रुपये**

**फक्त)** दंडाची शिक्षा का करण्यात  येवु नये? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर न केल्याने पुन्हासंधीचे पत्र जावक क्र.८११५/२०२४, दिनांक ०९/०९/२०२४ व (२) ९३०४/२०२४, दिनांक २३/१०/२०२४ अन्वये कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर करणे करीता पत्राव्दारे दोनसंधी देण्यात येवुन सुध्दातुम्ही स्पष्टीकरण सादर केलेले नाही. तरी कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये देण्यात आलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांना उपरोक्त कसुरी बाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार  "**रु. १०००/- (अक्षरी - एकहजार रुपये फक्त) दंडाचीशिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारख`पासुन ६० दिवसाच्या आत मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**२.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोहवा-१६८५ कोठे/१०८३२/२०२४ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२४**

## आदेश

**संदर्भ क्रमांक** **:-** १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक १६१/२०२४, दिनांक १२/०१/२०२४

२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअश/विचौ-२/कसुरी अहवाल/ का.दा.नो./पोहवा-१६८५ कोठे/२०६७/२०२४, दिनांक २६/०२/२०२४

**कसुरदारचे नाव :-**पोहवा/१६८५ अजय कोठे, नेमणुकपोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही पोहवा/१६८५ अजय कोठे, पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन पोलीस स्टेशन गाडगे नगर येथे खुपियाचे काम करता, तुम्ही कामामध्ये हयगय व निष्काळजीपणा करतात कोणतीही माहिती स्वत:हुन काढत नाही तसेच माहिती घेण्याबाबत सांगितले असता ते सुध्दा तुम्ही माहिती अवगत करत नाही. तसेच कोणतीही मिळालेली माहिती वेळेवर वरिष्ठांना सांगत नाही. त्यामुळे पोलीस स्टेशन सारख्या नेहमी आंदोलन, मोर्चा बंदोबस्त व इतर घटना घडत असतात त्याबाबतची माहिती ठाणेदार स्वत: व्यस्त असतांना घेणे शक्य होत नाही व तुमच्या निष्काळजीपणामुळे चांगल्या रितीने माहिती प्राप्त होत नसल्याचे आढळुन आले आहे. दिनांक ०९/०१/२०२४ रोजी घडलेल्या घटनांबाबत सुध्दा कोणतेही आऊटपुट (तात्काळ) खुपिया माहिती न दिल्याने बंदोबस्ताचे नियोजन करता आले नाही, त्यामुळे अनेक ठिकाणी विविध घटना घडलेल्या आहेत.

तसेच दिनांक १२/०१/२०२४ रोजी विद्याथयांचा मोर्चा हा रुक्मिणी नगर येथुन न निघता गर्ल्स हायस्कुल चौकातुन निघत असल्याचे विशेष शाखेमार्फत तुम्हाला (खुपिया) सकाळी १०.०० वा. कळविण्यात आले होते. परंतु त्याबाबत तुम्ही खुपिया या अधिकाराने मिळालेली माहिती ठाणेदार यांना तात्काळ सांगितली नाही व कळविले नाही. त्यानंतर शेवटच्या पाच मिनिटात विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक यांनी माहिती दिल्यावरुन बंदोबस्त त्याप्रमाणे बदलविण्यात आला. विशेष शाखा येथुन तुम्हाला (खुपिया) माहिती दिल्यांनतर ठाणेदार यांना त्याबाबत अवगत करणे (सांगणे) गरजचे असतांना सुध्दा माहिती सांगीतली नाही. परंतु याबाबत तुम्हाला ठाणेदार यांनी विचारणा केली असता तुम्ही (खुपिया) विनाकारण वाद घालुन मला खुपियाचे काम करायचे नाही माझी ईच्छा नाही अशा प्रकारे विशिष्ट उध्दटपणाने वागुन गैरवर्तन केली, अशा प्रकारचे तुमचे खुपियाचे वर्तन हे नेहमीचेच आहे. तरी पोलीस स्टेशन गाडगे नगर सारख्या पोलीस स्टेशनच्या दैनंदिन कामकाजामध्ये अडथळा निर्माण होत आहे. तसेच आगामी काळात निवडणुका असुन अशा परिस्थीत मध्ये गाडगे नगर पोलीस स्टेशन चे खुपियाचे काम चांगल्या प्रकारे करणे व महत्वाची माहिती हि वरिष्ठांना सांगणे गरजेचे आहे. तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर असतांना वाद करता, तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ५०००/- (अक्षरी - पाच हजार रुपये फक्त) दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये** ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तरी तुम्हाला आमचे आज्ञांकित कक्षात तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक ०५/१२/२०२४ अन्वये दिनांक ०६/१२/२०२४ रोजी तुम्हाला बोलाविण्यात आले असता. तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर आले नाही. तरी सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हाला पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ३०००/- (अक्षरी - तीन हजार रुपये फक्त) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतीत सादर करु शकता.

# भाग-३

## <u>वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण</u>

## <u>संकीर्ण</u>

**०१.पोआअ/आस्था-१/ अवलंबित सदस्य नोंद/५५/२०२४ अमरावती दि. ०२/०१/२०२५**

## <u>आदेश</u>

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अमंलदार यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांचेवर पुर्णपणे अवलंबून असलेले कुटूंबातील सदस्यांच्या नावाची नोंद वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रयोजनार्थसेवापटात नोंद विण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम/ब.नं. व नांव | नेमणूक | कुटूंबातील अवलंबित सदस्याचे नांव व अंमलदाराशी नाते | पती/पत्नी/आई वडिल/अविवाहित बहिण शासकीय सेवेत आहे किंवा नाही? |
|---|---|---|---|---|
| १. | पोशि/१८२० स्वप्नील राजेंद्र पापळकर | आर्थिक गुन्हे शाखा | श्री.राजेंद्र कृष्णराव पापळकर वडील -वय ६५ वर्षे<br>सौ.शोभा राजेंद्र पापळकर आई - वय ६२ वर्षे | नाही. |

पोलीस अंमलदारांचे बाबतीत १.शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग १.क्र.वैखप्र-२०१७/प्र.क्र.६१४/राकावि-२ दि.०२/०८/२०१९ २. क्र.वैखप्र-२०२२/प्र.क्र.१७५/राकावि-२, दिनांक १४.१२. २०२२ ३. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वैखप्र-२०२२/प्र.क्र.१७५/राकावि-२, दिनांक ०२.०८.२०२४ मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२८/४९३७/ मपोकुआयो/ २२/२०२२, दिनांक ०३.०५.२०२३ मधील (अ) ते (ड) अन्वये विवाहीत महिला शासकीय कर्मचाऱ्याने तिचे **आई-वडील किंवा सासू-सासरे या दोघांपैकी एकाचीच** वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीचा लाभ घेण्याकरीता निवड करता येते. त्यामुळे **वर नमुद महिला पोलीस अंमलदार यांनी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी निवड केलेल्या वरील अवलंबित सदस्यांच्या नावात त्यांचे सेवाकालावधीत <u>कसलाही बदल</u> करता येणार नाही.** तसेच वर नमुद पोलीस अंमलदार यांनी विनंती अर्जात नमुद केलेली माहिती खोटी, चुकीची अथवा दिशाभुल करणारी असल्याचे निदर्शनास आल्यास ते प्रचलित नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस